# महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६
# घोषणा

**राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१६** मधून मुलाखतीकरिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्याबाबतचा कार्यक्रम यापूर्वीच प्रसिध्द करण्यात आला आहे. तथापि ज्या उमेदवारांना मुंबई, औरंगाबाद, नागपूर व पुणे येथे विहित केलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय तपासणी करवून घेणे शक्य नाही, अशा उमेदवारांना आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या यादीतील १४ अतिरिक्त वैद्यकीय महाविद्यालय/ रूग्णालयापैकी ज्या ठिकाणी सोयीस्कर असेल त्या ठिकाणी वैद्यकीय तपासणी करता येईल, असे शासनाने कळविले आहे. त्यानुसार अशा उमेदवारांनी वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी.

२.वैद्यकीय तपासणी संदर्भातील औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुधारित संपर्क अधिकाऱ्यांचे नाव आणि दूरध्वनी क्रमांक सोबत नमूद करण्यात आला आहे.

३.सदर बाबआयोगाच्या संकेतस्थळावर '**नवीन माहिती**' या सदराखाली प्रसिध्द करण्यात आली आहे.

४. वरील शासनाचे पत्र उमेदवारांनी डाऊनलोड करुन घ्यावे आणि वैद्यकीय तपासणीकरिता वैद्यकीय मंडळाकडे सादर करावे.

विजया पडते<br>
उपसचिव (परीक्षा)<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

मुंबई<br>
दिनांक : १२ जानेवारी, २०१७

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४२१६

क्रमांक: टिआरएन-०११७/ प्र.क्र. ०३/सीपीटीपी
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : १२ .०१.२०१७

तात्काळ

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
कुपरेज टेलिफोन एमारत,
महर्षि कर्वे रोड, कुपरेज, मुंबई- ४०० ००१

**विषय:** **राज्य सेवा परीक्षा २०१६**
मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी पर्याप्त व्यवस्था करणेबाबत.....

**संदर्भ :** १.या विभागाचे पत्र समक्रमांक, दिनांक ७.०१.२०१७ व दि.१०/०१/२०१७
२. श्री. घाडीगावकर, अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा दूरध्वनी संदेश

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील दिनांक ०७.०१.२०१७ च्या पत्रान्वये राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१६ संदर्भातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या वैद्यकीय तपासणीसाठी आयोजन करण्याचे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांना अवगत करण्यात आले आहे. सदर पत्रातील परिच्छेद २ मध्ये "मुलाखतीच्या ठिकाणच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांव्यतिरीक्त उर्वरीत वैद्यकीय महाविद्यालयांच्या ठिकाणी आठवड्यातील किमान तीन दिवस वैद्यकीय मंडळाचे गठन करण्यात यावे, जेणेकरून त्या परिसरातील उमेदवार मुलाखत केंद्राच्या ठिकाणी असलेल्या वैद्यकीय महाविद्यालया ऐवजी सोयीस्कर महाविद्यालयात तपासणी करून घेऊ शकतील." अशा सूचना देण्यात आल्या आहेत. उमेदवार ज्या शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करून घेऊ शकतील त्या रुग्णालयांची यादी या सोबत उचित कार्यवाहीस्तव जोडण्यात आली आहे. तरी आपणांस विनंती करण्यात येते की मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर या ठिकाणी असणा-या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय तपासणी करणे शक्य नसल्यास उमेदवारांना सोबत जोडलेल्या यादीतील ज्या ठिकाणी सोईस्कर असेल त्या ठिकाणी वैद्यकीय तपासणी करून घेता येईल याबाबत उमेदवारांना अवगत करण्यात यावे. तसेच सोबत जोडलेल्या यादीतील मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर या ठिकाणी असणा-या वैद्यकीय महाविद्यालयांव्यतिरीक्त (संदर्भ क्र. १ येथील दिनांक १०.०१.२०१७ च्या शासन पत्रामध्ये नमूद) इतर वैद्यकीय महाविद्यांलयांमध्ये आठवड्यातील तीन दिवस वैद्यकीय मंडळाचे गठन करण्यात येणार असल्याने त्याबाबत उमेदवारांनी खात्री करून घेऊनच वैद्यकीय तपासणीसाठी जावे असे उमेदवारांना कळविण्यात यावे.

आपला,

(अजित देशमुख)
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

## वैद्यकीय शासकीय महाविद्यालय/ रुग्णालये

| अ.क्र. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १ | ग्रॅन्ट शा.वै.म.व सर ज.जी.समुह रुग्णालय, मुंबई |
| २ | बै.जी.शा.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वो. रु. पुणे |
| ३ | डॉ. वैंशपायन स्मृती शा.वै.म.व.छ.शि.म.स.स. सोलापूर |
| ४ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज |
| ५ | रा.छ.शा.म.शा.वै.म.व.छ.प्र.सर्वो. रुग्णलय, कोल्हापूर |
| ६ | श्री. भाऊसाहेब हिरे, शा.वै.म.व.सर्वो. रुग्णालय, धुळे |
| ७ | शा.वै.म. व रुग्णालय, औरंगाबाद |
| ८ | स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण वै.म.व.स.अंबाजोगाई |
| ९ | शा.वै.म. व सर्वो.रुग्णालय, लातूर |
| १० | डॉ. शं. चव्हाण शा.वै.म.व.श्री.गु.गो.स्मृ.शा.स.नांदेड |
| ११ | श्री. वसंतराव नाईक शा.वै.म.व. रुग्णालय, यवतमाळ |
| १२ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला |
| १३ | इंदिरा गांधी शा. वै.म.व. रुग्णालय, नागपूर |
| १४ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर |

| | |
|---|---|
| मुलाखतीचे केंद्र | औरंगाबाद |
| वैद्यकीय चाचणीचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद |
| संपर्क अधिकारी | डॉ. सय्यद अशफाक, अतिरिक्त उप वैद्यकीय अधिक्षक , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद (घाटी हॉस्पिटल)<br>(९०२८३१२३४१) ०२४०-२४०२४१२, Ext. २५०<br>email:- deangmca@gmail.com |

| मुलाखतीचा दिनांक | उमेदवारांची संख्या | वैदयकीय चाचणीचा दिनांक |
|---|---|---|
| १६.०१.२०१६ | १६ | १३.०१.२०१७ |
| १७.०१.२०१७ | १६ | १३.०१.२०१७ |
| १८.०१.२०१७ | १६ | १६.०१.२०१७ |
| १९.०१.२०१७ | १६ | १६.०१.२०१७ |
| २०.०१.२०१७ | १६ | १७.०१.२०१७ |
| २१.०१.२०१७ | ११ | १७.०१.२०१७ |
| एकूण | ९१ | |